# ऋ ण नि र्दे श

ज्ञात अज्ञात शक्तींच्या प्रेरणेने कोणत्याही कार्याची सुरवात होते. कर्ता नाममात्रच असतो. कर्ताकरविता अनेक स्थानी आपला मदतनीस बनतो. कार्य पूर्ण करण्याच्या धांदलीमध्ये तोच एक ध्यास कत्यास असल्याकारणाने तो सर्वांची मदत घेत घेत पुढे वाटचाल करीत असतो. कार्य पूर्ण झाल्यावर जेव्हा त्याला थोडी उसंत मिळते तेंव्हा तो सिंहावलोकन करु लागतो. आणि एक एक व्यक्ती त्याला स्मरु लागते. कृतज्ञतेने त्याचे मन हेलावून जाते. संशोधनकार्यातही प्रत्यक्ष , अप्रत्यक्षरित्या सर्व स्नेहांकितांचे सहकार्य लाभते. संशोधनासारखे कार्य तर अनेकांच्या सहकार्यानेच पार पडू शकते.

कोणत्याही कार्यात सहकार्य आवश्यक असते तसेच आणि तितकेच मार्गदर्शन ही आवश्यक असते. महासागरात सोडलेल्या नावेसाठी दीपस्तंभ हा हवाच.

माझ्या या संशोधन कार्याला योग्य दिशा देणारे माझे आदरणीय गुरुवर्य डॉ. आ.ह.साळुंखे होत. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळेच मी माझे संशोधन योग्य त-हेने पूर्ण करु शकले. प्रथम त्यांचे ऋण स्मरणे हे मी माझे कर्तव्य समजते. साळुंखे सरांप्रमाणेच डॉ. वराडे व श्रीमती राजेभोसले [सातारा] यांचे ही मार्गदर्शन लाभले.

वेळात वेळ काढून केवळ संस्कृत-प्रेमापोटी डॉ. वि.व.इनामदार [सांगली ] यांनीही मौलिक अशा प्रकारचे मार्गदर्शन केले.

संशोधन कार्यात महत्त्वपूर्ण आधार असतो तो पुस्तकांचा, आणि ही पुस्तके मला उपलब्ध करुन दिली.

१] सौ.योगिनी जोशी [विलिंग्डन कॉलेज. सांगली ]

२] श्री रास्ते 3] सांगली नगरवाचनालयातील ग्रंथपाल

४) के. ग. रा. पुरोहित कन्या प्रशालेतील, कु. श. मा. कुलकर्णी व श्रीमती अ. अ. कुलकर्णी
या सज्जन मंडळींनी.

के. ग. रा. पुरोहित कन्या प्रशालेतील उच्च माध्य. विभागाच्या प्राचार्या श्रीमती लेले सु. द. उपमुख्याध्यापिका सौ. चिटणीस व पर्यवेक्षिका श्रीमती करंदीकरबाई यांनी मला या कामात अनुमती दिली.

साताराचे श्रीयुत म्हसकर व सौ. म्हसकर यानीही मोलाचे सहकार्य केले.

पार्वती टायपिंग सेंटरचे श्री. जोशी यांनी टायपिंगचे काम दर्जेदार करून दिले. सर्व संयोजन कार्यात माझे काका श्री. य. म. जोशी यांनीही सर्वतोपरी मदत केली. बांधणी सजावटीच्या कामात चि. सुमंतने मोलाची भर घातली.

सर्वांच्या सदिच्छा व थोरांचे आशिर्वाद पाठीशी असल्यामुळेच हे शक्य झाले.

अशाप्रकारे मला प्रेरणा, प्रोत्साहन , मार्गदर्शन, सहकार्य देणा-या सर्वांची मी ऋणी आहे.

सौ. व्यास ज्योती भास्कर.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

# प्रस्तावना

"श्री"

"संस्कृत नाटकातील निसर्ग वर्णन" या विषयावर लघुशोध प्रबंध"

## - प्रस्तावना -

संस्कृत नाटकांच्या दृष्टीने निसर्ग हा एक पैलूदार हिरा आहे त्याचे तेज अनाकलनीय नाही, पण अवर्णनीय, अतुलनीय आहे हे निश्चित. संस्कृत कवी, नाटककार आणि निसर्ग यांचे साहचर्य सर्वश्रुत आहेच. किंबहुना निसर्गाशी तादात्म्य पावणे हा संस्कृत कवींचा धर्मच होता.

मानव निसर्गाशिवाय जगू शकत नाही. तो निसर्गसानिध्यातच रमतो. "मी निसर्गाशिवाय जगून दाखवेन. जेथे निसर्ग नाही अशा जागी मला जावयाचे आहे" असे जर कोणी म्हणेल तर ते मुळीच शक्य नाही. "जळी, स्थळी, काष्ठी , पाषाणी ईश्वर सर्वत्र आहे, सर्वव्यापी आहे" असे सांगताना देखील निसर्गाचीच मदत घ्यावी लागली. याचा अर्थ असा की मनुष्य कसाही असो साधा-भोळा अडाणी असो की सुशिक्षित , सुसंस्कृत असो त्याच्या जीवनाला निसर्गव्यापून उरला आहे. प्रत्येकाच्या जीवनात निसर्गाला महत्वाचे स्थान आहे. मानवाचे यच्चयावत् जीवन बहुतांशी निसर्गक्रमानुसारच चालते. साहजिकच माणसाला प्रत्येक नैसर्गिक घटनेविषयी कुतूहल वाटते. ते काही माणसे शब्दांकित करतात. काहींच्या मनात ते दाटते पण ते व्यक्त करू शकत नाहीत. जे शब्दांकित करतात ते कवी, नाटककार, कथाकाराच्या रूपात प्रसिध्दी पावतात. याचे द्योतक म्हणजेच आज प्रचलित असलेल्या लोककथा, पुराणकथा, साहित्यकृती होत. त्यामध्ये निसर्गातील घटनांना कधी व्यक्तिरूप दिलेले दिसते तर कधी निसर्गातील गोष्टींना देवत्व बहाल केलेले आढळते. नैसर्गिक घडामोडींच्या मागे जी अद्भुत

शक्ती आहे तिचा मनुष्य जीवनावरही पुष्कळ प्रभाव पडतो. त्या प्रभावामुळे तो त्या शक्तीची म्हणजेच निसर्गाची पूजा करु लागतो. आपल्या ऐहिक सुखासाठी तो धडपडू लागतो, याचा अर्थ निसर्गाचा संबंध केवळ शारीरिक सुखसमृध्दीसाठी श्रेष्ठ मानला आहे असे नव्हे तर निसर्ग हा मानवी भावनांशी, मानवी मनाशी तद्रूप झालेला आहे. एवढेच नव्हे तर तो गुरु म्हणून, मार्गदर्शक म्हणून मनोभावनांचा साक्षीदार म्हणून मानवी जीवनात इतका तादात्म्य पावलेला असतो की काही वेळा तो निसर्ग आहे हे वेगळेपणाने सूचित करावे लागते.

संस्कृत नाटककारांनी मानवी जीवनात निसर्गाचा आणि निसर्गात मानवी जीवनाचा साक्षात्कार घडविला आहे. जीवनातील विविध सुखदु:खांनी युक्त प्रसंग ज्यांत आहेत, अशा संस्कृत नाटकांशी निसर्गाचे हे तादात्म्य सुलक्षणीयतर आहेच शिवाय केवळ संकेत म्हणून नाट्यात निसर्ग आलेला नाही तर निसर्गाने नाटकांतील विविध पात्रां प्रमाणेच समर्थपणे भूमिकाही पेलल्या आहेत, असे मला वाटते. तरी इतर भूमिकांहून निसर्ग भूमिका ही अत्यंत वेगळी आहे. कारण इतर पात्रे एखाद्या विशिष्ट भूमिकेशी निगडित आणि मर्यादित अभिनय करतात परंतु निसर्गाला मात्र विविध प्रसंगी विविध भूमिका पार पाडाव्या लागल्या आहेत. किंबहुना नाट्याची निर्मितीच निसर्गात झाली आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. निसर्गाचे विविध बदलते रंग, बदलता नूर, बदलते सूर पाहूनच नाट्याची कल्पना मानवाच्या मनात साकार झाली असावी.

"नेमेचि येतो मग पावसाळा" असे जरी असले तरी नित्यनूतन भासणारा हा निसर्ग विविध रूपांनी आपल्या समोर प्रकट होतो. कधी तो सुंदर सप्तरंगी इंद्रधनू होऊन येतो, तर कधी वर्षाराणीचे गीत गात मेघांचे पडघम वाजवीत येतो. कधी तो वसंतातील कोकिळस्वर बनून येतो, तर कधी फुलांची उधळण करीत येतो. कधी पूर्वेला आरक्त

बनविणारा अरुण होतो तर कधीकमलिनींना हसविणारा सूर्य होतो. कधी पुनवेचा चांद बनून येतो तर कधी काळी काजळरात बनून येतो. कधी ग्रीष्मातील तप्त दुपार बनून येतो तर कधी शारदीय चांदण्याची बरसात करतो. कधी ढगांचा कापूस पिंजत येतो तर कधी अथांग माया पोटात दडविलेला सागर बनतो. कधी नदीरूपाने, वृक्षरूपाने परोपकाराचे धडे देणारा गुरु होतो. निसर्गाच्या या नाट्यामध्ये संगीताची साथ सुध्दा असते. पक्ष्यांचे कूजन, भ्रमराचे गुंजन, हंसांचा कलरव, निर्झराची झुळझुळ, वा-याची शीळ, असा वाद्यवृंद तयारच असतो. नर्तक मयूर पिसारा फुलवून नृत्य करीत असतो. असा विलोभनीय, पृथ्वीपासून आकाशापर्यंत व्यापून राहिलेल्या या निसर्गनाट्याला पाहून बुध्दिमान माणसाला नाट्याची कल्पना सुचली असावी.

सृष्टी सजते रोज नवा साज लेऊन, वर्षा, वसंत मानवी मनाला मोहवितात. त्यातून नवरसांना चालना मिळते त्यातून विभावानुभाव व्यभिचारींच्या योगाने शृंगाराची निर्मिती होते. जेव्हा शृंगार शिगेला पोहोचतो तेव्हा काव्य जन्माला येते. आणि मग त्यातून दृश्यकाव्य जन्मते. दृश्यकाव्य म्हणजे नाट्य आकाराला येते. असा हा क्रम आहे. म्हणूनच नाट्याची निर्मिती निसर्गात झाली असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही.

नाटक या प्रकारात वर्णनास फारसा वाव नसतो कारण नाटकात जे व्यक्त [illegible] करायचे असते ते संवादांमार्फतच! कोणी लांबलचक वर्णन करीत बसला तर ते नाट्याला मारक ठरते. परंतु संस्कृत नाटककारांनी मात्र या निसर्ग मित्राचा उपयोग अत्यंत खुबीदारपणे नाट्याला उठाव देण्यासाठी करून घेतला आहे. सामान्यत: कवी रसिकांना त्याच्या सौंदर्याची इंद्रियगम्य प्रतीती देण्यासाठी निसर्गाचा काव्यात वापर करतात.

पण हा झाला निसर्गाचा प्राथमिक उपयोग. या शिवाय निसर्गाचा वापर कधी पार्श्वभूमी म्हणून, कधी विरोधाने किंवा साम्याने नाटकाला उठाव देण्यासाठी केला गेला आहे. कविलोकांना निसर्ग व मानव यामध्ये साम्य आढळते किंबहुना या जवळिकीच्या नात्यामुळेच निसर्गाच्या उपमा मानवाला व मानवाच्या निसर्गाला दिल्या जातात. दोघांत सहसंवेदन असते. मानवाच्या बरेवाईट पणानुसार निसर्ग सुखी अथवा दु:खी होतो. अशी वर्णने नाटयात आढळतात. म्हणूनच संस्कृत नाटकांतील निसर्ग मानवी भावभावनांनी युक्त आहे. तो सचेतन आहे.

संस्कृत नाटककारांनी मानवाच्या चित्तवृत्तींतील चढउतार निसर्गा माध्यमातून दाखविले आहेत. निसर्गाचे प्रतिबिंब मानवी मनात पडते. आणि मानवी जीवनाचे प्रतिबिंब नाटकांत असते. नाटकात मानवी भावभावनांचे अनेक रेशमी धागे जुळविले जातात. अर्थातच निसर्ग, मानवी मन आणि मानवी जीवन असा हा त्रिकोण असल्याने साहजिकच नाटकांमध्ये निसर्गाचे प्रतिबिंब पडलेले आपल्याला दिसते.

प्रस्तुत लघुशोधप्रबंधात काही प्रमुख संस्कृत नाटके घेऊन त्यातील निसर्गाची वर्णने अर्थात निसर्गाची नाटयप्रतिबिंबित रूपे, निसर्गाने नाटय सौंदर्यात घातलेली भर याचा विचार केलेला आहे.

— ० —